2017 – 18

2017-18
2017

## *N.S.S.R's, Arts & Sci. College, Chousala, Tq. & Dist. Beed*

### Criteria III- Research Innovations and Extension

### (जर्नल संशोधन पेपर माहिती)

1. नाव :- प्रा. डॉ. चव्हाण एम. एच.
2. विषय :- अर्थशास्त्र
3. जर्नल नाव :- Global Economic Research
4. ISBN / ISSN No. :- ISSN 2249-4081
5. संशोधन पेपर नाव :- भारतातील अन्न सुरक्षितता विधेयक चिकीत्सक अभ्यास,
6. प्रकाशित वर्ष :- Oct. 2017 – Mar-2018 (Half Yearly)
7. अनुक्रमणिका क्रमांक :- ~~63~~ 10
8. पृष्ठ क्रमांक :- 63 - 66
9. प्रकाशन पत्ता :- Jyotichandra Publication Latur-413531
10. प्रकाशक व प्रकाशन ई-मेल :-
8. प्रकाशक व प्रकाशन मोबाईल क्र. किंवा फोन क्र. :- 9423346913

संकलक स्वाक्षरी

प्राध्यापक स्वाक्षरी

IMPACT FACTOR 4.95

ISSN 2249-4081

*UGC Approved National Registered & Recognized Research Journal Related to Higher Education for Economics & Commerce*

# GLOBAL ECONOMIC RESEARCH

UGC APPROVED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL

**Issue - XIV, Vol. - II**
**Year - VII, (Half Yearly)**
**(Oct. 2017 To Mar. 2018)**

**Editorial Office :**
'Gyandev-Parvati',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

**Contact :** 02382-241913
09423346913 / 09503814000
07276305000/ 09637935252

**Website**
**www.irasg.com**

**E-mail :**
interlinkresearch@rediffmail.com
visiongroup1994@gmail.com
mbkamble2010@gmail.com

**Published by :**
JYOTICHANDRA PUBLICATION
Latur, Dist. Latur - 413531 (M.S.)India

**Price : ₹ 200/-**

**CHIEF EDITOR**

**Dr. Arun Tawar**
Head, Dept. of Economics,DSM Mahavidyalaya,
Parbhani, Dist. Parbhani (MS) India
Chairman, BOS, Economics, SRTM University,
Nanded, Dist. Nanded (MS) India

**MEMBER OF EDITORIAL BOARD**

**Dr. Vasant K. Bhosale**
Prabhani, Dist. Prabhani (M.S.)

**Dr. Deelip S. Arjune**
Jalna, Dist. Jalna (M. S. )

**Dr. Rajendra Dhane**
Dharwad, Dist. Dharwad (Karnataka)

**Dr. Balaji G. Kamble**
Latur, Dist. Latur (MS) India

**Dr. Rajendra Gawhale**
Khamgaon, Dist. Buldhana (M.S.)

**Dr. Santosh T. Kute**
Khamgaon, Dist. Buldhana (M.S.)

**Dr. R. D. Ganapure**
Osmanabad, Dist. Osmanabad (M.S.)

**Dr. Vikas V. Sukale**
Nanded, Dist. Nanded (M.S.)

**Dr. Karamsingh Rajput**
Vani, Dist. Yavatmal (M.S.)

**Dr. Balasaheb S. Patil**
Panvel, Dist. Raigarh (M.S.)

**Dr. Sachin B. Napate**
Pune, Dist. Pune (M.S.)

**Dr. Ganpat Gaikwad**
Kolhapur, Dist. Kolhapur (M.S.)

**Dr. M. Selva Kumar**
Sivakashi, Dist. Sivakashi (T.N.)

**Dr. Madhav Palmatte**
Latur, Dist. Latur (MS) India

**Dr. Ashok K. Vala**
Amreli, Dist. Amreli (Gujrat)

**Dr. Suresh B. Dhake**
S.N.D.T. University, Mumbai (M.S.)

**Dr. Kumar Prabhakar**
Lakhisarai (Bihar)

**Dr. T. Prasanna**
Koppa, Dist. Chicmagalur, (Karnatka)

Issue : XIV, Vol. II
GLOBAL ECONOMIC RESEARCH
IMPACT FACTOR 4.95
ISSN 2249-4081
Oct. 2017 To Mar. 2018

# INDEX


| Sr. No | Title for Research Paper | Page No. |
|---|---|---|
| 1 | The Buying Decision Process and Types of Buying Decision Behavior **Dr. P. T. Pawar** | 1 |
| 2 | A Study of Bank Employees - Leave Facility of Nationalised and Private Banks **Sambhaji E. Patil** | 11 |
| 3 | Sugar Industries in Maharashtra **D. P. Biradar** | 18 |
| 4 | Export Performance of Special Economic Zones and its Economic Contribution in India **Dr. Arun Tawar** | 26 |
| 5 | Present Situation of Employment in India Industrial Sector and Globalization **Dr. Yeshwant Chavan** | 35 |
| 6 | Analysis of Reasons Behind Failure of many Banks in Financing Priority Sector and Msme Sector in Rural **Dr. Mahesh Deshmukh** | 40 |
| 7 | Unemployment : A Challenge Before Indian Economy **Dr. Arun Patil** | 44 |
| 8 | भारतातील स्त्री-पुरूष गुणोत्तराचा असमतोल कारणे व उपाय **डॉ. बालाजी कांबळे** | 52 |
| 9 | नागरी व्यवस्थापन काळाची गरज **व्ही. के. माळोदे, डॉ. दिलीप अर्जुने** | 58 |
| 10 | भारतातील अन्न सुरिक्षितता विधेयक चिकित्सक अभ्यास **माणिक चव्हाण** | 63 |
| 11 | पारंपारिक हातमाग विणकाम करणाऱ्या कामगारांची स्थिती **डॉ. गजानन कुबडे** | 67 |

Issue : XIV, Vol. II
GLOBAL ECONOMIC RESEARCH
IMPACT FACTOR 4.95
ISSN 2249-4081
Oct. 2017 To Mar. 2018 63

# भारतातील अन्न सुरिक्षितता विधेयक चिकित्सक अभ्यास

**माणिक चव्हाण**
अर्थशास्त्र विभाग,
कला व विज्ञान महाविद्यालय,
चौसाळा, जि. बीड (महाराष्ट्र) भारत

## RESEARCH PAPER - ECONOMICS

10

**प्रस्तावना:-**

कोणत्याही देशातील नागरीकांना दैनंदिन जीवन जगण्यासाठी जीवनावश्यक गरजांची आवश्यकता असते. त्यामध्ये प्रामुख्याने अन्न, वस्त्र, निवारा, पाणी, आरोग्य, शिक्षण या सुविधा आवश्यक असतात. याना सामाजिक सुविधा असे म्हटले जाते. या सुविधा ज्या देशात उपलब्ध असतात तो देश प्रगत मानला जातो. अशा सुविधा मिळत असतील तर नागरीकांची कार्यक्षमता वाढते. जगातील कोणत्याही विकसित राष्ट्राने या जीवनावश्यक सुविधा समावेशक पध्दतीने सर्वांना उपलब्ध करून द्याव्यात असे मानले जाते. जर कायदा करून शासनाने अशा सुविधा हमीने आणि माफक किंमतीला पुरेशा प्रमाणात उपलब्ध करून दिल्या तर त्याला सामाजिक सुरक्षा असे म्हटले जाते. अन्न सुरक्षा म्हणजे लोकांकरीता किमान अन्नधान्याची पुर्तता करणे असा मर्यादित अर्थ लावला जातो. परंतु या किमान अन्नधान्यामध्ये योग्य गुणवत्ता व त्याची योग्य मात्रा असणे आवश्यक असते.

**व्याख्या:-**

१) **भारतीय अन्न आणि कृषी संघटन (FAO-१९८३):-** अन्न सुरक्षितता म्हणजे देशातील सर्व लोकांना गरजेनुसार केंव्हाही भौतिक आणि आर्थिक जीवन जगण्यासाठी पुरेशे अन्न मिळणे होय.

२) **जागतिक विकास अहवाल (१९८६):-** लोकांना सक्रीय राहण्यासाठी व आरोग्यदायी जीवन जगण्यासाठी नेहमी पुरेशा अन्न पुरवठ्याची सोय उपलब्ध करून देणे म्हणे अन्न सुरक्षितता होय.

३) **स्ताझ (१९९०) :-** देशातील अन्नधान्य व्यवस्थेकडून एकूण लोकसंख्येला प्रोटीनयुक्त, सकस आन्नधान्यांचा वेळेवर व विश्वासनीयरित्या पुरेसा पुरवठा करण्याच्या क्षमतेची हमी देणे म्हणजे अन्न सुरक्षितता होय.

**संशोधनाची उद्दिष्टे:-**

१) भारतातील अन्न सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेणे.

२) भारतातील अन्न सुरक्षा विधेयकातील तरतुदींचा अभ्यास करणे.

३) भारतातील अन्न सुरक्षा लागू करतांना येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती:-**

प्रस्तुत निबंधामध्ये दुय्यम साधन सामुग्रीचा वापर केला असुन Economy Survey मासिके, वर्तमानपत्रे, वेबसाईड, संदर्भग्रंथ, कृषीविषयक संपादकीय लेख इत्यादींचा वापर केलेला आहे.

**भारतातील अन्न सुरक्षेची पार्श्वभुमी:-**

भारतामध्ये अन्नधान्य उत्पादनासाठी व ते सर्व जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी पुर्वीपासुन अनेक प्रकारचे प्रयत्न केलेले आहेत. पहिल्या महायुध्दापर्यंत भारत अन्नधान्यांचा निर्यात करणारा देश होता. सन १९३५ मध्ये ब्रह्मदेश भारतापासुन वेगळा झाला. तेंव्हा अन्नधान्यांच्या समस्येस सुरुवात झाली. सन १९३९ मध्ये मुंबईत सार्वजनिक वितरण व्यवस्था लागू करण्यात आली. सन १९४२-४३ मध्ये बंगालमध्ये दुष्काळ पडला. त्यामुळे लाखो लोक उपासमारीमुळे मृत्यूमुखी पडले. सन १९४३ मध्ये अन्नधान्य चौकशी समिती स्थापन करण्यात आली. भारतीय राज्यघटनेत कलम २१ नुसार प्रत्येक व्यक्तीला जगण्याचा हक्क असुन त्यात अन्न घटकांचा समावेश आहे. सन १९५६ पासुन अमेरिकेतून पी.एल.४८० या कलमाअंतर्गत अन्न धान्याची आयात केली जात असे. संयुक्त राष्ट्रसंघाने सन १९९९ साली कायदा करून मानवाचा अन्नासाठी मुलभूत अधिकार कायदा मान्य केला. सन १९६५-६६ पासुन हरित क्रांतीचा प्रयोग सुरू केल्यामुळे भारत अन्नधान्याच्या उत्पादनात स्वयंपुर्ण झाला. भारतीय राष्ट्रीय विकास परिषदेच्या ५३ व्या सभेत २००७ मध्ये अन्न सुरक्षा अभियान जाहीर केले. सन २००७-०८ पासुन राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान अमंलात आणले व अन्न सुरक्षा विधेयक सन २०१३ मध्ये संसदेत मंजूर केले. या योजनेअंतर्गत समाजातील अशा लोकांना अंर्तभुत केले जे लोक दारिद्र्यरेषेच्या खाली आहेत आणि सामान्य कुटुंब जे दारिद्र्यरेषेच्या वर आहे. त्यामध्ये ७५ टक्के ग्रामीण लोकांना परंतु ग्रामीण भागातील ४६ टक्के बीपीएल कुटुंब असतील आणि ५० टक्के शहरी लोकांना परंतु शहरी भागातील २८ टक्के कुटुंब बीपीएल असतील यांना जास्तीत जास्त सबसिडी दरावर अन्न उपलब्ध केले जाईल. ज्यामध्ये तांदुळ, गहु आणि जाडे भरडे अन्न अनुक्रमे ३, २, १ रूपये प्रतिकिलो या दराने मिळेल.

**अन्न सुरक्षा विधेयकातील आर्थिक तरतुद:-**

अन्न सुरक्षा विधेयक मंजूर होण्याअगोदर अन्न सुरक्षितेवरील खर्चाची तरतुद ही ६३००० कोटी रूपये एवढी होती. परंतु विधेयक पास झाल्यानंतर अन्न सुरक्षा विधेयकातील खर्चात वाढ करण्यात आली व ही रक्कम ९५००० कोटी रूपये एवढी करण्यात आली. या विधेयकानुसार अन्न धान्याची मागणी ५.५ कोटी मॅट्रिक टनावरून ६.१ मॅट्रिक टन एवढी वाढली आहे. विधेयक पास झाल्यानंतर येणाऱ्या दोन वर्षासाठी लागणारे अन्नधान्य सरकारी धान्य गोदामात आहे. परंतु या विधेयकानुसार अन्न सुरक्षा करण्यासाठी कृषी उत्पादन वाढविण्याची आवश्यकता आहे व हे कृषी उत्पादन वाढविण्यासाठी ११०००० कोटी रूपयांची गुंतवणुक कृषी क्षेत्रात करावी लागेल.

**भारतातील सार्वजनिक वितरण व्यवस्था:-**

भारतामध्ये अन्न धान्याचे वितरण व्यवस्थित करण्यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्था लागू करण्यात आली. या व्यवस्थेअंतर्गत सरकारच्या अन्न महामंडळाकडील अन्न राज्य सरकारला उपलब्ध करून देणे व या अन्नाचे वितरण निर्धारित किंमतीनुसार करता यावे म्हणून स्वस्त धान्य दुकानाची स्थापना सार्वजनिक वितरण व्यवस्थेत केली जाते. अन्नधान्याची किंमत निर्धारित करण्याचे कार्य केंद्र सरकार करते. म्हणजेच केंद्र सरकार अन्नधान्याच्या किंमती ठरवते. अशा किंमतींना वाटप किंमती असे म्हणतात. या वाटप किंमती ठरवत असतांना अन्नधान्याची खरेदी किंमत व वाहतुक खर्च लक्षात घेऊन कालानुरूप ठरविल्या जातात.

**सरकारी साठा:-**

भारत सरकारच्यावतीने भारतीय अन्न महामंडळ Food Corporation of India (FCI) अन्नधान्याचा साठा करत असते. या साठ्याचा उपयोग सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत अन्नधान्याची खरेदी करण्याची कुवत नसणाऱ्यांना अन्नधान्य पुरवठा करण्यासाठी होतो. अन्नधान्याचा हा साठा किमान व कमाल किती असावा हे केंद्र सरकार ठरवत असते.

**अंत्योदय योजना:-**

भारतात सन २००० सालापासुन या योजनेचा प्रारंभ करण्यात आला. या योजनेअंतर्गत दारिद्र्यरेषेखालील एकूण कुटुंबापैकी १० लाख कुटुंबाची निवड करून त्या प्रत्येक कुटुंबाला २ रूपये किलो दराने गहु व ३ रूपये किलो दराने तांदुळ असे एका महिन्यात २५ किलो धान्य पुरविले जाते.

**संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना:-**

भारताच्या पंतप्रधानांनी १५ ऑगस्ट २००१ मध्ये ही योजना जाहीर केली. या योजनेनुसार केंद्र सरकार राज्य सरकारांना कोणतीही किंमत न घेता ५ दशलक्ष टन अन्न धान्य पुरवेल व त्याआधारे राज्य सरकार ग्रामीण भागात रोजगार निर्मिती करून रोजगाराचा मोबदला हा अन्नधान्याच्या स्वरूपात कामगारांना दिला जाईल.

**समस्या:-**

१) देशाच्या अर्थव्यवस्थेची आजची स्थिती पाहता एकट्या या विधेयकावर ३ ते ४ कोटी रूपये खर्च करणे शक्य आणि योग्य आहे काय? हा प्रश्न पडतो. जर हा खर्च सरकार करणार असेल तर देशातील इतर विकास कामांना कात्री लावावी लागेल.

२) प्राधान्य आणि सामान्य गटात कोणती व्यक्ती येतील याचे स्पष्ट निकष नाहीत.

३) या विधेयकातील तरतुदी पाहता हे विधेयक आकर्षक वाटले तरी याची योग्य व काटेकोरपणे पालन होईल यात शंका वाटते.

४) ज्यांना प्रत्यक्ष धान्य मिळू शकत नाही. त्यांना रोख पैसे पुरविण्यात येतील असे यात नमुद केले आहे आणि यात भ्रष्टाचार होण्यासाठी संधी आहे.

५) अन्न सुरक्षा विधेयक गरीब जनतेसाठी अत्यंत उपयुक्त असले तरी या एकाच योजनेवर वर्षानुवर्ष प्रचंड खर्च करून आळशी व कामचोर जनता निर्माण करण्यापेक्षा तो पैसा विधायक कामासाठी लावणे केंव्हाही चांगले.

**सारांश:-**

भारतात अन्न सुरक्षा विधेयक हे उपासमार, गरीबी व कुपोषण यांच्या विरोधात उचललेले एक चांगले पाऊल आहे. परंतु हे विधेयक योग्य रितीने लोकांपर्यंत पोहचणे आवश्यक आहे. जर असे झाले तर भारतातील उपासमारीमुळे जाणारे बळी, कुपोषणामुळे जाणारे बळी काही प्रमाणात कमी होतील. फक्त हे विधेयक कोणत्याही राजकीय पक्षाच्या राजकीय हेतूने प्रभावित नसावे. खऱ्या अर्थाने ते समाजासाठी लागू करण्यासाठी यावे.

## संदर्भ सूची :-

१. भारतीय अर्थव्यवस्था, डॉ. एस.के. ढगे-२०१३.
२. सकाळ अग्रोवन.
३. अन्न सुरक्षा विधेयक-२०१३.
४. Department of Food & Public Distribution Government of India.
५. योजना मासिक, डिसेंबर -२०१३.